# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०३/२०२४ (शनिवार) सायंकाळ**

---

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोस्टे कन्हान:—** अंतर्गत शिवनगर कन्हान येथे दिनांक २९/०३/२०२४ चे १९.३० वा. दरम्यान फिर्यादी व जखमी नामे— सौ. आकाशना राहुल चाफले वय २९ वर्ष, रा. शिवनगर वार्ड कन्हान जुनघरे यांचे घरी किरायाने ता. पारशिवनी जि. नागपूर व फिर्यादीचा पति व **आरोपी नामे— राहुल चिंतामण चाफले वय ३३ वर्ष, रा. पिपरी शिवाजी नगर कन्हान ता. पारशिवनी जि. नागपूर** हे पत्नी व पती असुन पती दारू पिण्याचे सवईचे असल्याने मागील एक वर्षापासुन पती हा पत्नीला मारझोड करीत असायचा त्यामुळे पत्नी ही पतीचे घर सोडुन दोन मुलांसह गावातच वेगळी किरायाचे घरात राहत होती, तरी आरोपी पती हा पत्नीसोबत वारंवार झगडा भांडण करायचा. घटना वेळी आरोपी पती हा पत्नी राहत असलेल्या ठिकाणी एका प्लॉस्टीक बॉटलमध्ये पेट्रोल घेवुन गेला व पत्नीला घरी चाल नाहीतर तुला पेट्रोल टाकुन आग लावतो म्हणुन धमकी दिली व पत्नीने नकार दिल्याने, आरोपीने त्याचे जवळील प्लॉस्टीक बॉटलमधील पेट्रोल स्वत:चे अंगावर व पत्नीचे अंगावर टाकुन, लायटरने आग लावली. आरोपीने पत्नीला जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने जखमी पत्नीचे अंगावर पेट्रोल टाकुन आग लावुन गंभीर जखमी करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कन्हान येथे आरोपीविरूद्ध कलम ३०७ भादवी अन्वये गुन्हा नोंद असुन आरोपीचा मेडीकल हॉस्पीटल नागपूर येथे वैद्यकीय उपचार सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास स.पो.नि. पराग फुलझेले पो.स्टे. कन्हान हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**